पिंपरी चिंचवड महानगरपालिका
स्वच्छ महाराष्ट्रभारत/ अभियान (नागरी) प्रकल्प अंमलबजावणी कक्ष
Email – sbm.ihhlin.gov.pcmcindia@ Website – www.pcmcindia.gov.in
फोन क्रमांक – ०२० - विस्तारीत क्रमांक ६७३३३३३३-१५०७

# जाहीर प्रकटन

## (स्वच्छ नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान स्पर्धा )

केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान (नागरी ) धर्तीवर राज्यामध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी ) राबविण्यात येत आहे. स्वच्छ सर्वेक्षण २०२२ मध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने सहभाग घेतला आहे. स्वच्छ भारत / महाराष्ट्र अभियान अंतर्गत स्वच्छ नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान स्पर्धा (स्वच्छ इनोव्हेटिव्ह टेक्नॉलॉजी चॅलेंज) आयोजित करण्यात आले आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील सर्व नागरिक, नविन उदयोजक, कंपनी, शैक्षणिक संस्था, माहिती तंत्रज्ञान व्यावसायिक इ. ना या स्पर्धेमध्ये सहभागी होणेसाठी आवाहन करण्यात येत आहे.

स्पर्धेकरीता (competition) खालील बाबींचा समावेश असेल.

१. सदर स्पर्धा फक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामधील नागरिकांसाठी आहे.

२. प्रथम, द्वितीय व तृतीय स्तरावर प्रशस्तीपत्रक व रोख रक्कम देण्यात येईल. रोख स्वरूपात अदा करण्यात येणा-या बक्षिसांचे स्वरूप पुढील प्रमाणे राहिल.

| अ.क्र | तपशील | बक्षिसांची संख्या | बक्षिसांची एकुण रक्कम |
|---|---|---|---|
| १ | प्रथम क्रमांक | १ | ४१,०००/- |
| २ | द्वितीय क्रमांक | १ | ३१,०००/- |
| ३ | तृतीय क्रमांक | १ | २१,०००/- |
| | एकूण | ३ | ९३,०००/- |

३. स्पर्धेचे विषय - खालील विषयांवर नाविन्यपुर्ण उपक्रम असावेत -

- सामाजिक हित -
- कचरा मुक्तता -
- प्लास्टीक कचरा व्यवस्थापन -
- पारदर्शकता –

स्पर्धकांनी खालीलप्रमाणे तपशीलामध्ये आपले उपक्रम सादर करणे आवश्यक आहे. याकरीता फोटो व व्हिडीओचा वापर करावा.

| अ.क्र. | तपशील | उपाय/ पर्याय (हे मर्यादित नाही. याव्यतिरिक्त उपाय/ पर्याय असु शकतात) |
|---|---|---|
| १ | सामाजिक समावेश (सामाजिक समावेशामुळे स्वच्छतेसाठी चांगली कामाची स्थिती निर्माण होते) | • कमी उत्पन्न असलेल्या वसाहतीं / झोपडपटटी क्षेत्रामध्ये सुधारित कचरा संकलन आणि व्यवस्थापनासाठी सामाजिक नवकल्पना<br>• सेप्टिक टाक्या आणि सीवर लाइन साफ करण्यासाठी कमी किमतीची कार्यक्षम यांत्रिक उपाययोजना(मॅनहोल ते मशीन होल)<br>• आरोग्यदायी आणि शाश्वत पद्धतीने सामुदायिक आणि सार्वजनिक शौचालयांचे कार्यक्षम देखभाल<br>• वापरलेले पाणी, मैला आणि सेप्टेजची योग्य प्रकारे निर्वासन, वाहतुक, प्रक्रिया आणि विल्हेवाट |
| २ | कचरा मुक्तता | • घरोघरी वर्गीकरण केलेल्या घनकचऱ्या ट्रॅकींग करण्यासाठी नाविन्यपूर्ण उपाय.<br>• विलगीकरण केलेल्या घनकचरा प्रक्रिया आणि पुनर्वापर<br>• लेगसी डंपसाइटच्या दुरुस्तीसाठी कमी किमतीचे पोर्टेबल उपाय |
| ३ | प्लास्टीक कचरा व्यवस्थापन | • प्लास्टिक कचऱ्यावर प्रक्रिया आणि पुनर्वापर<br>• पुनर्वापर करताना प्लास्टिकचे होणारे ऱ्हास कमी करणे<br>• पर्यावरण संवेदनशील प्रदेशात प्लास्टिक कचरा व्यवस्थापन.<br>• बहुस्तरीय प्लास्टिकचे संकलन आणि त्याची विल्हेवाट लावण्यासाठी नाविन्यपूर्ण पद्धती.<br>• लेगसी डंपसाइट्समधून प्लास्टिकच्या विल्हेवाट लावण्यासाठी तंत्रज्ञान.<br>• प्लास्टिक साठी पर्यावरण पुरक पर्याय |
| ४ | पारदर्शकता | • सेप्टिक टाक्या आणि सीवर लाइनचा ओव्हरफ्लो तपासण्यासाठी डिजिटल |

| | | |
|---|---|---|
| | | उपाय.<br>• जनजागृती व क्षमता बांधणीसाठी नागरिक सहभाग.<br>• IoT आधारित स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापन पायाभूत सुविधांच्या ऑपरेशन्सच्या रिअल टाइम मॉनिटरिंग |

उपक्रमामध्ये खालील निकषाचा वापर होणे आवश्यक आहे व गुणांची पद्धत इत्यादी सविस्तर माहिती खालीलप्रमाणे –

| अ.क्र. | निकष |
|---|---|
| १ | उपायाची मुख्य वैशिष्टे<br>१) कमी वापर करणे, पुर्नवापर करणे आणि पुन्हा वापरणे शक्य आहे<br>२) प्रक्रिया अधिक सक्षम करणे<br>३) उपायासाठी इतर कोणताही कोणतीही वैशिष्टे |
| २ | वापरण्यात येणाया तंत्रज्ञानाची मुख्य वैशिष्टे-<br>१. वेगळेपणा २. कमी खर्च ३. कमी देखभाल ४. वेळ आणि मेहनतची बचत<br>५. वापरण्यास अनुकुल |
| ३ | ऑपरेशनल मॉडेल-<br>काम करावयाच्या ठिकाणी काम करणेकरिता एक मॉडेल आहे का? |
| ४ | व्यावसायिक मॉडेल<br>१) व्यावसायिक रित्या कोठे अंमलबजावणी झाली आहे का?<br>२) आर्थिक लाभ आहे का?<br>३) आर्थिक लाभ होण्याची क्षमता आहे का? |
| ६ | प्रतिकृती<br>कोणत्याही परिस्थितींमध्ये सहजतेने उत्तरदायी आणि भिन्न भौगोलिक परिस्थितीत अनुकूलतेसाठी उपयुक्त असा उपाय |
| ७ | मापण क्षमता<br>सोल्यूशनची पोहोच जनतेपर्यंत वाढवणे आणि आधिक सक्षम करण्यासाठी स्केलेबल असेल |
| ८ | अंमलबजावणीसाठी लागणारा वेळ |
| ९ | स्वदेशी तंत्रज्ञान - स्थानिक बाजारपेठेत सहज उपलब्ध असलेली उपकरणे/ भाग वापरून विकसित केलेल्या तंत्रज्ञानाला प्राधान्य दिले पाहिजे |

स्पर्धेच्या अटी,शर्ती -

१) यासाठी कोणत्याही वयाची अट नाही.
२) स्पर्धक पिंपरी चिंचवड शहरातील रहिवासी असावा.
३) पिंपरी चिंचवड शहरासाठी उपक्रम डिजाईन केलेला असावा.
४) स्पर्धेत सहभागी होणा-या स्पर्धकांची नाव, संपर्क क्रमांक, ई-मेल, उपक्रमाचा विषय, नाविन्यपुर्ण उपक्रमाचा सविस्तर तपशिल व वरील ९ मुददयांच्या निकषानुसार देण्यात यावे.
५) आवश्यकता असल्यास समितीच्या निर्णयानुसार सादरीकरण करावे लागेल.
६) निवड प्रक्रियेबाबत समितीने घेतलेला निर्णय अंतिम राहील.
७) आपल्या प्रवेशिका sbm2020@pcmcindia.gov.in ई-मेलवर ३०डिसेंबर पर्यंत पाठविण्यात याव्यात. ३०डिसेंबर २०२१ पर्यंत स्पर्धेमध्ये सहभागी होता येईल. यानंतर येणारे उपक्रम विचारात घेतले जाणार नाही.
८) अटी,शर्ती ठरविणे , त्यामध्ये बदल करण्याचा अधिकार मा.आयुक्त यांना राहिल.

सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, नागरिकांच्या सहकार्याने आणि पाठीब्यांने शहराच्या घनकचरा व्यवस्थापन प्रणालीमध्ये सुधारणा करण्यासाठी तांत्रिक मदत होऊ शकते. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील सर्व नागरिक, नविन उदयोजक, कंपनी, शैक्षणिक संस्था, माहिती तंत्रज्ञान व्यावसायिक इ. ना या स्वच्छ भारत अभियानाच्या स्वच्छ नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान स्पर्धा (स्वच्छ इनोव्हेटिव्ह टेक्नॉलॉजी चॅलेंज) मध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यात येत आहे. स्पर्धकांनी आपल्या प्रवेशिका sbm2020@pcmcindia.gov.in ई-मेलवर ३० डिसेंबर पर्यंत पाठविण्याची नोंद घ्यावी.

(राजेश पाटील) २१/१२/२१
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

जा.क्र. : स्वभाअक/ १ /कावि/224/२०२१
दिनांक : 21/12/२०२१
ठिकाण